# ऑरिक हॉलचे काम डिसेंबरपर्यंत होणार पूर्ण

**औरंगाबाद / प्रतिनिधी**

शेंद्रा येथे सुरू असलेल्या औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटीमधील मुख्य रस्त्यांचे जाळे पूर्ण करण्यासाठी एआयटीएलने कंबर कसली आहे. अँकर प्रकल्पापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांवर वॉटर बाऊंड मॅकडम (डब्ल्यूबीएम) टाकून डांबरीकरण करण्यात येत आहे. जुलै २०१८ पर्यंत करमाडजवळील रेल्वे उड्डाणपूल खुला करण्याचे प्रयत्न आहेत. ऑरिक हॉलचे काम झपाट्याने सुरू असून, डिसेंबर २०१८ ची डेडलाईन आहे. ऑक्टोबर २०१८ पर्यंत ऑरिक हॉलची निर्मिती करण्याचा मानस असल्याची माहिती डीएमआयसीचे सहव्यवस्थापक गजानन पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी समन्वयक किशनराव लवांडे, एमआयडीसीचे

## जुलैपासून धावणार उड्डाणपुलावरून वाहने

प्रादेशिक अधिकारी सोहम वायाळ, विष्णू लोखंडे उपस्थित होते.

शेंद्रा औद्योगिक वसाहतीत ऑरिक हा औद्योगिक हब सुमारे >> पान/६



ऑरिक सिटीचे सुरू असलेले काम.

## ह्योसंग, बाएहे मेडिकल समवेत करार

कोरियन कंपनी ह्योसंग ही टेक्स्टाईलमध्ये शेंद्र्यात ३ हजार ४०० कोटींची गुंतवणूक करत आहे. मॅग्नेटिक महाराष्ट्र अंतर्गत झालेल्या करारानुसार १०० एकर जागेमध्ये हा प्रकल्प उभारला जाणार आहे. जानेवारी २०१९ पर्यंत कंपनीची उभारणी होऊन मे २०१९ पासून प्रत्यक्षात प्रॉडक्शनची निर्मिती करण्यात येणार आहे. याशिवाय चीनची अग्रगण्य वैद्यकीय उपकरणे तयार करणारी कंपनी बाएहे मेडिकल १० एकरामध्ये प्रकल्प उभारत आहे. ११० कोटींची गुंतवणूक कंपनी करणार आहे. ही कंपनी डायलिसीसची उपकरणे तयार करण्यात अग्रणी आहे. याशिवाय चायनीज कंस्ट्रक्शन क्षेत्रातील कंपनी १५० कोटींची गुंतवणूक करणार असून २० एकर जागेत कंपनी प्रकल्प उभारणार आहे.